**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री. रफीक अब्दुल रहेमान काझी
शत्रुंजय प्लाझा, रो हाऊस नं ५,
कात्रज कोंढवा रोड, पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उप आयुक्त (मुख्यालय २)
पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी**
पोलीस उपआयुक्त (मुख्यालय-२) यांचे कार्यालय,
पोलीस आयुक्तालय, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९५/२०१०/पुणे |
| २ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२२.०७.२००९ |
| ३ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती-** खंडणी घेतल्याची तक्रार असलेल्या पोलीस नाईक श्री.मोहिते व पोलीस हेड कॉन्स्टेबल श्री.शेख, क्राईम ब्रँच,पुणे यांच्या विरुध्दच्या विभागीय चौकशीबाबत | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. रफीक अब्दुल रहेमान काझी यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत मूळ माहिती-मागणी अर्ज (जोडपत्र-अ) जोडलेले नाही. मात्र आयोगाकडील अपील अर्जात त्यांनी नमूद केल्याप्रमाणे खुलासा मागणी माहितीचा अधिकार अधिनिमय,२००५ अंतर्गत करता येत नाही. तथापि

संबंधित प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त (मुख्यालय-२) यांचे कार्यालय, पोलीस आयुक्तालय, पुणे यांनी देणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता श्री. रफीक अब्दुल रहेमान काझी यांनी माहिती-मागणी अर्जात नमूद केल्याप्रमाणे विभागीय चौकशीच्या कारवाईची व अपीलकर्त्याची त्यांच्याविरुध्दची तक्रार याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त (मुख्यालय-२) यांचे कार्यालय, पोलीस आयुक्तालय, पुणे यांनी अपीलकर्त्यास दि.१५.०२.२०१० पर्यंत द्यावी व त्याची प्रत आयोगास सादर करावी.

**पुणे**
**दिनांक : २५/०१/२०१०**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

१. श्री. भागवत भिमराव सोमवंशी
२. कु. रेश्मा भागवत सोमवंशी
घर क्र. २७६३, मातोश्री लक्ष्मी निवास,
देहूफाटा, आळंदी देवाची, ता. हवेली,
जि.पुणे

अपीलकर्ता

**विरुध्द**

**१. अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त (सामान्य प्रशासन), पुणे विभाग, पुणे

**२. अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद आळंदी, जि. पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी, नगरपालिका प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९५२ +९७४ + १७३१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३.३.२००९ |
| ३ | **उपस्थित** | |

**अपीलकर्ता** श्री. भागवत भिमराव सोमवंशी
घर क्र. २७६३, मातोश्री लक्ष्मी निवास,
देहूफाटा, आळंदी देवाची, ता. हवेली, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त (सामान्य प्रशासन), पुणे विभाग, पुणे
श्री. पी. एस. पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद
आळंदी, जि. पुणे श्री. पी. ए. वंजेरी

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ९५२ / पुणे | १९.१२.२००६ | १७.१.२००७ | २९.१.२००७ | २३.४.२००७ |
| ९७४/ पुणे | १५.५.२००९ | २५.६.२००९ | २२.६.२००९ | -- |
| १७३१ / पुणे | १५.१०.२००७ | १२.११.२००७ | २६.११.२००७ | २८.१२.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जांच्या (जोडपत्र-अ) छायाप्रती सोबत जोडल्या आहेत. | | | |

## विवेचन

आळंदी नगरपरिषदेत शिपाई म्हणून आपण काम करीत असताना अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईत आपल्याला झालेल्या मारहाणीनंतर वैद्यकीय खर्च, पगार, यात्रा भत्ता आदी न देणे, कामावर रूजू करून न घेणे, पदोन्नती व वेतनवाढ रोखणे, न्यायालयाच्या आदेशाचे पालन न करणे याबाबतची माहिती आपण मागितली होती. तत्कालीन मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद श्री. संजीव ओहोळ आपल्यावर सतत अन्याय करून नियमबाह्य वागवीत असल्याबद्दल केलेल्या तक्रारीची दखल घेतली जात नाही व माहिती चुकीची, पूर्वगृहदूषित व दुष्ट हेतूने नाकारली गेली. अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त (सामान्य प्रशासन), पुणे विभाग, पुणे यांनी दिलेल्या निर्णयाची कार्यवाही श्री. ओहोळ यांनी केली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. भागवत भिमराव सोमवंशी यांनी केली.

श्री. सोमवंशी हे आळंदी नगरपरिषदेत शिपाई म्हणून रोजंदारीवर कामाला होते. नंतर त्यांना कायम करण्यात आले. त्यांनी विचारलेली माहिती प्रामुख्याने खुलासा व स्पष्टीकरण मागणारी आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद श्री. संजीव ओहोळ यांनी विहित मुदतीत त्यांना उत्तर दिले आहे. दि. २६.६.२००६ च्या शासन निर्णयाप्रमाणे प्रस्ताव पाठवून श्री. सोमवंशी यांना कायम केले जाईपर्यंत रोजंदारीवर ठेवावे, असे आदेश असताना पूर्वीच्या मुख्याधिकाऱ्यांनी त्यांना कायमपणाचे फायदे दिले. त्यांच्या रास्त देय रकमेबाबत योग्य ती कार्यवाही करुन आदेश काढले जाणार आहेत. तथापि या सर्व बाबी प्रशासकीय कार्यवाहीच्या आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येणाऱ्या नाहीत, असे प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद श्री. पी. ए. वंजेरी यांनी केले.

श्री. सोमवंशी व त्यांचे कुटुंबीय यांनी त्यांच्या मागण्यांच्या संदर्भात अनेक अर्ज व अपिले केली असून त्यात प्रामुख्याने खुलासा, स्पष्टीकरण अथवा प्रशासकीय कार्यवाही याची मागणी आहे, ते माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त, पुणे विभाग, पुणे श्री. तुकाराम कासार यांनी श्री. सोमवंशी यांच्या अपिलावर दिलेल्या निर्णयात प्रामुख्याने प्रशासकीय कार्यवाही करण्याचे आदेश जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद यांना दिले आहेत, असे विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त, पुणे विभाग, पुणे श्री. पी. एस. पाटील यांनी नमूद केले.

श्री. सोमवंशी यांची मागणी माहितीची नसून प्रशासकीय कार्यवाहीची आहे. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त (सामान्य प्रशासन), पुणे विभाग, पुणे यांनी अशी कार्यवाही करण्याचे आदेश माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील अपिलावर दिले आहेत. त्या आदेशाची अमंलबजावणीबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती श्री. सोमवंशी यांना पंधरा दिवसांत देऊन आयोगाला अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगापुढील अपील क्र.९५२ च्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद यांनी वैद्यकीय बिल व अनुज्ञेय वैद्यकीय अर्जाचे वेतन अदा करण्याबाबत मान्य केले होते. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत असल्याचे जन माहिती अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी, नगरपालिका प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे यांनी श्री. भागवत सोमवंशी यांची कन्या कु. रेश्मा भागवत सोमवंशी यांच्या अपील क्र. १७३१ च्या संदर्भात दि.३०.४.२००९ च्या पत्रान्वये 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी आयोगास कळविले.

श्री. सोमवंशी यांना आयोगापुढील सुनावणीनंतर वैद्यकीय खर्चाची रक्कम रू.१०१८१/- अदा करण्यात आली. श्री. सोमवंशी यांच्या पद निर्मितीबाबत आंळदी नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन पंधरा दिवसांच्या आत अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन), पुणे विभाग, पुणे यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल. त्यांची सेवा नियमित करणे आदी बाबींबाबत नियमाप्रमाणे प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे, असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद श्री. पी. ए. वंजेरी यांनी दि. २५.५.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले. परंतु आपल्या मागणीबाबत नगरपरिषद प्रशासनाने वैद्यकीय

खर्चाची रक्कम देण्याव्यतिरिक्त कोणतीही कार्यवाही केली नसल्याची तक्रार श्री. सोमवंशी दि. ३०.१२.२००९ च्या पत्रासह सातत्याने आयोगाकडे करीत आले आहेत. तथापि त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. मात्र जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद, आळंदी यांनी दि. २५.५.२००९ च्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे पद निर्मितीचा प्रस्ताव आदीबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे.

**अपील क्र. ९७४** : श्री. सोमवंशी यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद यांनी दिली आहे. श्री. सोमवंशी यांनी माहिती चुकीची असल्याचे म्हटले असले तरी कार्यवाही चुकीची असल्याचा त्यांचा आक्षेप आहे.

**अपील क्र. १७३१** : श्री. सोमवंशी यांची कन्या कु. रेश्मा भागवत सोमवंशी यांचे हे अपील असून आपल्या वडिलांवर श्री. संजीव ओहोळ यांनी केलेल्या अन्यायाबाबत आपल्या वडिलांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केलेल्या अर्जावरील कार्यवाहीबाबतची माहिती त्यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद, आळंदी यांच्याकडे मागितली आहे. व कारवाई केली नसल्यास का केली नाही, याची विचारणा केली आहे. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी, नगरपालिका प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांनी त्यावर विहित मुदतीत उत्तर दिले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद, आळंदी यांनी आयोगास सादर केलेल्या दि. २५.५.२००९ च्या निवेदनात नमूद केल्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि. १५.२.२०१० पर्यंत आयोगास सादर करावा व त्याची एक प्रत अपीलकर्त्यास पुरवावी.

**पुणे**
**दि. २७.१.२०१०**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दत्तात्रय मोहन पेठकर
आर/ओ ११५२अ, विष्णू गल्ली, मु.पो.तासगाव, जि.सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज, जि.सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज, ता.मिरज ,जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९६४+९६६ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.४.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दत्तात्रय मोहन पेठकर
आर/ओ ११५२अ, विष्णू गल्ली, मु.पो.तासगाव, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज, जि.सांगली श्री.एस.व्ही.जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज, ता.मिरज ,जि.सांगली प्रतिनिधी श्री.ए.ए.पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१६.१०.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.११.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८.१२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. १.३.२००९ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१६.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१६.४.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

कुपवाड येथील आपल्या मालकीच्या वडिलोपार्जित जमिनीतून केलेल्या रस्त्यापोटी नुकसानभरपाई मिळण्याची मागणी मान्य केली जात नाही. तसेच त्या संदर्भातील शासन निर्णय, नकाशे यांच्या प्रती दिल्या नाहीत. कळविलेले शुल्क जास्त असल्यामुळे अपील केले नाही. तसेच नकाशाची किंमत ६ रूपये होत नसल्यामुळे शुल्क भरले नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.दत्तात्रय मोहन पेठकर यांनी केले.

श्री.पेठकर यांनी मागितलेल्या माहितीसाठी विहित मुदतीत त्यांना शुल्क कळविण्यात आले. हे १५५ रूपये शुल्क भरल्यानंतर त्यांना माहिती देण्यात आली. काही कागदपत्रांच्या प्रती अस्पष्ट असल्याचे व त्यामुळे वाचता येत नसल्याचे त्यांनी म्हटले होते. सुस्पष्ट प्रती देण्याचे व खात्याकडील कागदपत्रांच्या प्रती प्रमाणित करून देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज, जि.सांगली यांनी दिले. त्यानुसार कार्यवाही केली. बिनशेती आदेश व रेखांकन रद्द करावे, गेलेल्या क्षेत्राची नुकसानभरपाईची रक्कम व्याजासह मिळावी, आदी श्री.पेठकर यांनी केलेल्या मागण्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,

सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज, जि.सांगली यांचे प्रतिनिधी श्री.ए.ए.पाटील व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज़, जि.सांगली श्री.एस.व्ही.जाधव यांनी केले. अपीलकर्त्यास संबंधित नकाशाची प्रत निःशुल्क द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३०.१.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दत्तात्रय मोहन पेठकर
आर/ओ ११५२अ, विष्णू गल्ली, मु.पो.तासगाव, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक, नगररचना, नगररचना आणि
मूल्यनिर्धारण विभाग, पुणे विभाग, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक संचालक, नगररचना,
सांगली नगररचना आणि मूल्यनिर्धारण विभाग, सांगली शाखा, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९६३ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.४.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दत्तात्रय मोहन पेठकर
आर/ओ ११५२अ, विष्णू गल्ली, मु.पो.तासगाव, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक, नगररचना, नगररचना आणि
मूल्यनिर्धारण विभाग, पुणे विभाग, पुणे श्रीमती एस.पी.नाईक

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक संचालक, नगररचना, सांगली नगररचना
आणि मूल्यनिर्धारण विभाग, सांगली शाखा, सांगली श्री.एस.जी.पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४.७.२००८ व ११.८.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०.९.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.११.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१६.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१६.४.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपल्या मागणीनुसार कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती मिळाल्या नाहीत. तसेच मुदतीआधी अपील केल्यामुळे अपील फेटाळले, असे अपीलकर्ता श्री.दत्तात्रय मोहन पेठकर यांनी नमूद केले.

श्री.पेठकर यांनी आपल्या कार्यालयातील सर्व कागदपत्रे पाहण्यास, वाचण्यास देण्याची व त्याच्या प्रमाणित प्रती मिळण्याची मागणी केली होती. त्यांच्या अर्जात ११७ प्रश्न व उपप्रश्न मिळून ४२२ प्रश्नांची उत्तरे मागितली आहेत. इतर शासकीय कार्यालयाकडून त्यांनी प्राप्त करून घेतलेल्या माहितीतील उल्लेखाबाबतचे प्रश्नही त्यांनी त्यात विचारले आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार देय असणारी माहिती देण्यासाठी त्यांना शुल्क कळविले, त्यांनी ते भरले नाही. शुल्क भरल्यास कोणत्याही क्षणी माहिती देता येईल, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगररचना, सांगली नगररचना आणि मूल्यनिर्धारण विभाग, सांगली श्री.एस.जी.पाटील यांनी केले. अपील फेटाळले असले तरीही अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध असून शुल्क भरल्यास संबंधित माहिती दिली जाईल, असे त्यांना कळविले. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळीही तसे सांगितले, असे अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक, नगररचना, नगररचना आणि मूल्यनिर्धारण विभाग, पुणे विभाग, पुणे श्रीमती

एस.पी.नाईक यांनी नमूद केले. ते लक्षात घेता अपीलकर्त्यास माहिती आवश्यक असल्यास शुल्क भरून प्राप्त करून घेता येईल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि.२९.१.२०१०

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.अनंत भानुदासराव विद्यागर
त्रिमूर्ती हाऊसिंग सोसायटी, कुर्डुवाडी रोड, बार्शी, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक, महाविद्यालये व
विद्यापीठ विकास मंडळ, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९६४ / **सोलापूर** |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८.०३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अनंत भानुदासराव विद्यागर
त्रिमूर्ती हाऊसिंग सोसायटी, कुर्डुवाडी रोड, बार्शी, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक, महाविद्यालये व
विद्यापीठ विकास मंडळ, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
विद्यमान-डॉ.रा.ना.शेंडगे, तत्कालीन- डॉ.एम.एस.शेजूळ

| | | |
|---|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर<br>विद्यमान-श्री.द.म.वळेकर, तत्कालीन-डॉ.पी.डी.माळी | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.१.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ८.२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ९.३.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. ८.२.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.८.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२८.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात बी.कॉम.भाग-२ च्या, 'पर्यावरण अभ्यास' या परीक्षेत आधी अनुत्तीर्ण झालेले १६ विद्यार्थी नंतर उत्तीर्ण करण्यात आले. त्या संदर्भात दोषी व्यक्ती कोण व केलेली कार्यवाही याची माहिती आपण मागितली होती, ती जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांनी विहित मुदतीत दिली नाही. विषयांशी संबंधित नसलेल्या व्यक्तींना प्रश्नपत्रिका काढू दिली जाते. अभ्यासक्रमात नसलेल्या भागांवर त्यामुळे प्रश्न विचारले जाण्याचे प्रकार घडतात व त्यावर विद्यापीठ कारवाई करीत नाही, यात विद्यापीठाचे नुकसान असून कुलगुरूंची ही फसवणूक सबंधित अधिकारी/कर्मचारी करीत आहेत, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.अनंत भानुदासराव विद्यागर यांनी केले.

उपलब्ध माहिती श्री.विद्यागर यांना देण्यात आली. संबंधित विषयातील कारवाईबाबत परीक्षा मंडळ दखल घेईल, असे प्रतिपादन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर श्री.द.म.वळेकर यांनी केले.

'पर्यावरण अभ्यास' हा नवीन अभ्यासक्रम सोलापूर विद्यापीठात सुरू केला. शिवाजी विद्यापीठाच्या परिपत्रकातील संबंधित विषय-शिक्षकांच्या यादीवरून निवड करण्यात आली. तथापि अयोग्य प्रकारे निकाल जाहीर झाला, ही वस्तुस्थिती आहे. मात्र निकालातील चुका सहा दिवसात दुरूस्त करण्यात आल्या. रात्रभर बसून प्रामाणिकपणे काम करून आपण हे काम केले. श्री.आर.एस.निकम हे संबंधित पर्यवेक्षक होते व त्यांच्यावर कारवाई करण्यात आली नाही, असे निवेदन तत्कालीन परीक्षा नियंत्रक डॉ.पी.डी.माळी यांनी केले. संबंधित विषयात चौकशी समिती नेमून कारवाई करणे अपेक्षित असल्यामुळे अद्याप कारवाई झालेली नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर डॉ.आर.एन.शेंडगे यांनी सांगितले.

सोलापूर विद्यापीठ हे नव्याने स्थापन झालेले विद्यापीठ असून निकालाबाबतची अशी चूक होणे विद्यार्थ्यांच्या, तसेच विद्यापीठाच्याही दृष्टीने चिंताजनक आहे. एकूणच यंत्रणेच्या व संस्थेच्या विश्वासार्हतेशी संबंधित असा हा विषय आहे. त्यामुळे संबंधित विषयातील कारवाईची माहिती अपीलकर्त्यांना व त्याद्वारे नागरिकांना कळणे आवश्यक आहे. सोलापूर विद्यापीठ या सार्वजनिक प्राधिकरणाचे प्रमुख असलेले कुलगुरू यांनी याची त्वरित दखल घेऊन केलेल्या कार्यवाहीची माहिती अपिलीय प्राधिकारी तथा संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांना उपलब्ध करून द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अधिष्ठाता, शिक्षण शास्त्र विद्या शाखा, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर डॉ.एच.एन.जगताप यांची चौकशी समिती नियुक्त केल्याचे कुलगुरू प्रा.डॉ.बी.पी.बंडगर यांनी दि.२९.१.२००९ च्या पत्रान्वये आयोगास कळविले. या समितीचा अहवाल दि.२५.९.२००९ च्या बैठकीत परीक्षा मंडळासमोर ठेवण्यात आला. परीक्षा मंडळाने त्याबाबत केलेला ठराव

दि.५.१.२०१० रोजी प्राप्त झाला, असे अपिलीय प्राधिकारी तथा संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर डॉ.आर.एन.शेंडगे यांनी दि.५.१.२०१० च्या पत्रान्वये अहवालाच्या प्रतीसह आयोगास अवगत केले. मूळ प्रकरणात केलेली कार्यवाही / घेतलेला निर्णय योग्य की अयोग्य हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत निर्णयार्थ येणारा विषय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२१.१.२०१०**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दत्तात्रय मोहन पेठकर
आर/ओ ११५२अ, विष्णू गल्ली, मु.पो.तासगाव, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक मुख्य अभियंता,
सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी(तांत्रिक)** तथा उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९६५ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.४.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दत्तात्रय मोहन पेठकर
आर/ओ ११५२अ, विष्णू गल्ली, मु.पो.तासगाव, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक मुख्य अभियंता,
सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे श्री.अ.दा.वीर

**जन माहिती अधिकारी(तांत्रिक)** तथा उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे तत्कालीन श्री.अ.दा.वीर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.७.१२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११.१२.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १९.१.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. २५.२.२००९ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१६.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१६.४.२०९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपल्या जमिनीतून गेलेल्या रस्त्याबाबतची प्रशासकीय मान्यता, प्रस्ताव, नकाशे, भूसंपादनाची कागदपत्रे आदी माहिती विहित मुदतीत दिली नाही. कोणतीही कागदपत्रे प्रमाणित करून दिली नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.दत्तात्रय मोहन पेठकर यांनी केली. रस्त्याला दिलेल्या प्रशासकीय मान्यतेबाबतची कागदपत्रे, अंदाजपत्रक यांच्या प्रती श्री.पेठकर यांनी मागितल्या होत्या. माहितीच्या दृष्टीने त्यांचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर यांच्याकडे विहित मुदतीत वर्ग करून श्री.पेठकर यांना तसे कळविले. सहाय्यक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर यांनी माहिती देण्यासाठी हा अर्ज उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मिरज यांच्याकडे वर्ग केला. उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मिरज यांनी श्री.पेठकर यांना शुल्क कळविले. शुल्क भरून श्री.पेठकर यांनी १७४ पानांची माहिती घेतली. अन्य माहिती मिळणे बाकी आहे, असे त्यांनी नमूद केले. परंतु अन्य माहिती म्हणजे कोणती हे कळविले नाही. तसेच हीच माहिती यापूर्वीही श्री.पेठकर यांना देण्यात आली होती. श्री.पेठकर याच विषयाबाबत सातत्याने अर्ज करतात व माहितीची मागणी नेमकी व सुस्पष्ट नसते. प्रशासकीय

कार्यवाही करून माहिती द्यावी,असे त्यांच्या मागणीचे स्वरूप असते, असे जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.अ.दा.वीर व अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे श्री.अ.दा.वीर यांनी नमूद केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे व निवेदने पाहता श्री.पेठकर यांनी नेमकेपणाने माहिती मागणे आवश्यक असल्याची समज त्यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२८.१.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दत्तात्रय मोहन पेठकर
आर/ओ ११५२अ, विष्णू गल्ली, मु.पो.तासगाव, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९६७ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.४.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दत्तात्रय मोहन पेठकर
आर/ओ ११५२अ, विष्णू गल्ली, मु.पो.तासगाव, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर श्री.डी.जी.मळेकर

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर श्री.एस.व्ही.जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१६.८.२००८, २०.८.२००८ व ४.८.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५.८.२००८ व २९.८.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२.९.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. १८.११.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१६.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१६.४.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपण मागणी केलेली जमिनीची मोजणी व नुकसानभरपाई यांच्या संदर्भातील अर्ज व अर्जात नमूद असलेली अनय खात्याची कागदपत्रे यांच्या प्रमाणित प्रती दिल्या जात नाहीत. तसेच मूळ अर्जानुसार मोजणी करून नुकसानभरपाई देण्याबाबतची कारवाई केली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.दत्तात्रय मोहन पेठकर यांनी केली.

श्री.पेठकर यांची मुख्य मागणी प्रशासकीय कारवाईची असून दि.४.८.२००८, दि.१६.८.२००८ व दि.२०.८.२००८ रोजी त्यांनी तीन अर्ज केले आहेत. त्या संदर्भातील 'माहिती' या संज्ञेत बसणारी सर्व माहिती त्यांना देण्यात आली आहे. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, मिरज, ता.मिरज, जि.सांगली यांनी सार्वजनिक बांधकाम खात्याची पत्रे प्रमाणित करून दिली आहेत. मात्र अन्य खात्यांनी पाठविलेल्या पत्राच्या प्रती प्रमाणित करून देणे शक्य नसल्याचे त्यांना वेळोवेळी स्पष्ट करण्यात आले आहे. तरीही पुनः पुन्हा त्याच मागणीसाठी व मोजणी, नुकसानभरपाई अशा प्रशासकीय कार्यवाहीसाठी सातत्याने अर्ज करीत

असतात, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, मिरज, ता.मिरज, जि.सांगली श्री.एस.व्ही.जाधव व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम, मिरज, ता.मिरज, जि.सांगली श्री.डी.जी.मळेकर यांनी केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२९.१.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.उमेश शंकर बोरकर
ओ/४, मार्बल आर्च सोसायटी,
हरेकृष्ण मंदिर मार्ग, मॉडेल कॉलनी, पुणे-१६ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा** सहायक कर आकारणी व
करसंकलन प्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे **उत्तरवादी**

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९८/२०१०/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२०.४.२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१६.०५.२००९ |
| ४ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती-** पुणे महानगरपालिका हद्दीतील भूखंडावर मालमत्ता कर आकारणीसंदर्भातील माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.उमेश शंकर बोरकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन त्यांनी अपिलीय प्राधिकाऱ्याकडे प्रथम अपील केल्याचे दिसून येत नाही. तसेच मूळ अर्जावर जन माहिती अधिकारी तथा सहायक कर आकारणी व करसंकलन प्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी माहितीसह उत्तर दिले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक : २९ /०१/२०१०**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुभाष बाळासाहेब बारसे
नादब्रम्ह सोसायटी, डी-१, ५ वा मजला,
फ्लॅट नं.१७, वारजेनाका, पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अधीक्षक,
भूमी अभिलेख, सी.बी.एस.जवळ,
हॉटेल पद्मा, नासिक शहर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** तालुका निरीक्षक,
भुमी अभिलेख, नांदगांव, जि.नाशिक

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३५/२०१०/पुणे |
| २ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२६.०९.२००९ |
| ३ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती-</u>** मौजे मनमाड येथील स.नं.१७९ च्या मोजणीच्या संदर्भातील पत्रव्यवहार | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता, श्री.सुभाष बाळासाहेब बारसे यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले अपील हे विहित नमुन्यात (जोडपत्र-क) नाही. तसेच अपीलासोबत आवश्यक शुल्क (रुपये २०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर) जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक : ३०.०१.२०१०**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**